# सेंपरिट गुणवत्ता आणि सुरक्षा, आरोग्य आणि पर्यावरण धोरणे

Quality Safety Health Environment

सर्व कर्मचाऱ्यांना आमच्या सेंपरिट एकत्रीत व्यवस्थापन प्रणाली पूर्ण करण्यात व त्याची देखभाल करण्यातील त्यांची भुमिका व जबाबदारी यांची जाणीव आहे याची आम्ही हमी देतो. आम्ही ज्या देशांमध्ये व्यवसाय करतो त्या देशांमधील लागू असलेले कायदे आणि नियम यांचे पालन करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. सर्व कर्मचाऱ्यांना स्वयंप्रेरित काम करणे आणि शाश्वत सुधारणांच्या कामात व्यस्त ठेवणे आवश्यक आहे. सुधारणांसाठी आलेल्या सुचनांची कार्यक्षमता तपासली जाते आणि शक्य असेल तेथे वेगवान अंमलबजावणीसाठी श्रेय दिले जाते. आम्ही पुरेसा आणि योग्य जागतिक दर्जा अवलंबतो आणि ही उद्दिष्टे पुर्ण करण्यासाठी नीट विचार करून साधनसामुग्री पुरवतो. या धोरणांनुसार कंपनीची कामगिरी असल्याची आणि त्यांचे पालन होत असल्याचे पाहणे ही आमची जबाबदारी आहे.

ही धोरणे आमच्या कंपनीच्या संस्कृतीत आणि सहकारी मुल्यांमध्ये प्रतिबिंबित होतात. प्रत्येक काम दर्जेदार करणे आणि एसएचई विचारसरणीचा अवलंब करणे हा आमच्या उद्दिष्टांचा भाग असून आमची उद्दिष्टे ध्येयधोरणे निश्चित करण्यासाठी व सातत्यपूर्ण सुधारणा प्राप्त करण्यासाठी आखल्या जाणाऱ्या कार्यक्रमांचा पाया आहे. ही "जागतिक दर्जा उत्पादन" संकल्पना अंमलबजावणी आणि एकात्मतेसह प्रतिबिंबित करते, जे "शून्य एक सुंदर संख्या" आणि तत्वत: क्यूट्टएसएचइ च्या तत्वज्ञानाचे अनुसरण करीत आहे.

## गुणवत्ता

- आम्ही शक्य तितक्या कमीत कमी किमतीत "शून्य दोष विचारसरणी" वर आधारित उत्पादनांची निर्मिती करतो आणि आमच्या ग्राहकांच्या तसेच उत्पादनांच्या गरजांशी सुसंगत ठेवतो.
- आम्ही आमच्या ग्राहकांसाठी उत्पादन गुणवत्ता, तांत्रिक प्रगती आणि किंमत परिणामकारकता यांच्याबाबतीत दीर्घ कालीन विश्वासार्ह भागीदार आहोत.
- आम्ही आमच्या जबाबदाऱ्यांनुसार दिलेल्या कामाच्या दर्जा साठी जबाबदार आहोत! म्हणून, आम्ही लागू असलेल्या गरजा पूर्ण करण्याचे पालन करतो.
- आमचा विश्वास आहे कीं गुणवत्ता आमच्या प्रत्येक कामाचा अविभाज्य भाग आहे! संपूर्ण वेळ आणि कंपनीतील प्रत्येक कामाच्या जागेवर.

## सुरक्षा, आरोग्य आणि पर्यावरण (एसएचई)

- आम्ही असे अधोरेखित करतो की "शून्य घटना" प्राप्त करण्याकरीता कोणतेही काम इतके महत्वाचे असू शकत नाही जे सुरक्षा, आरोग्य व पर्यावरण यांच्या जोखमीवर असेल.
- आम्ही जास्तीत जास्त सुरक्षा, आमचे कर्मचारी, अभ्यागत, पुरवठादार, कंत्राटदार आणि इतर प्रमुख भागधारक यांचे आरोग्य व कल्याण यांची काळजी, ऊर्जा कार्यक्षमतेला चालना आणि कायमस्वरुपी पर्यावरणाचे संरक्षण यांच्यासाठी आराखडे तयार करुन व्यवस्थापन करतो व प्रदुषण प्रतिबंधित करतो.
- आम्ही आताच्या आणि भविष्यातील कार्यांसाठीचे धोके व परिणाम, एसएचई घटक पाहून त्यांचे मूल्यमापन व व्यवस्थापन करतो आणि आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांसाठी सामाजिक जबाबदारी घेतो.
- आमच्या उत्पादनांची रचना, प्रक्रियांचा विकास, प्रकल्प आणि सेवा या सर्व ठिकाणी सर्व एसएचई घटकांना आमची कौशल्ये पणाला लावतो.
- आम्ही कोणत्याही आपत्कालीन घटना, दुर्घटना आणि व्यवसायातील अडथळयांसाठी नियोजन करून, प्रतिसाद देतो आणि सर्व अडथळयांवर मात करतो. एसएचई बाबत कोणताही प्रश्न असल्यास त्याचा अभ्यास करून योग्य पद्धतीने कारवाई करतो.

आम्ही असे अधोरेखित करतो की "शून्य घटना" प्राप्त करण्याकरीता कोणतेही काम इतके महत्वाचे असू शकत नाही जे सुरक्षा, आरोग्य व पर्यावरण यांच्या जोखमीवर असेल. गुणवत्ता आणि एसएचई धोरणा प्रती व्यवस्थापकीय मंडळ आणि सर्व कर्मचारी पूर्णपणे कटिबद्ध आहेत व ज्यातून हे अधोरेखित होते की, सातत्यपूर्ण सुधारणेतूनच शाश्वत स्पर्धात्मकता आणि यशाची हमी प्राप्त होते!

**Martin Füllenbach**
**CEO**

**Frank Gumbinger**
**CFO**

**Michele Melchiorre**
**COO**

डिसेंबर 2017

SEMPERIT

Version 2- 12/2017